# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ५३३ /२०१९**

**तक्रारकर्ता श्री. शरद काशिनाथ धुमाळ**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (परि-५),**
गृह (परिवहन) विभाग, दुसरा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव (परिवहन)**
गृह (परिवहन) विभाग, दुसरा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १२.०३.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित<br>(ट्रॅकिंग रिपोर्टनुसार नोटीस पोहोच झाली आहे.) |
| विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

तक्रारकर्ता यांनी दि. २७.१२.२०१९ च्या अर्जान्वये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये आयोगास तक्रार अर्ज दाखल केला आहे.

२. सदर तक्रार अर्जात त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, गृह (परिवहन) विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दि.२०.०८.२०१९ रोजी माहितीचा अर्ज सादर केला होता. अर्जात अपेक्षिलेली माहिती विहित मुदतीत न मिळाल्याने प्रथम अपील सादर केले होते. दि.०४.११.२०१९ रोजी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून प्रथम अपिलीय अधिकारी यांनी ई-मेल संदेशाबाबतची माहिती देण्याचे निर्देश जन माहिती अधिकाऱ्यांना दिले होते. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि.२८.११.२०१९ च्या पत्रान्वये असे कळविले की, परिवहन-५ (गृह विभाग) या कार्यासनाची प्राप्त ई-मेल संदेशाबाबतची माहिती निरंक आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण, दिशाभूल करणारी व खोटी माहिती दिल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० (१) अन्वये त्यांना दंडाची शिक्षा करण्यात यावी. तसेच, त्यांना मोठ्या प्रमाणात मानसिक, आर्थिक त्रास सहन करावा लागला आहे म्हणून कलम १९ (८) (ख) नुसार रु.५० हजार नुकसान भरपाई देण्याचे आदेश व्हावेत.

३. सदर तक्रार सुनावणी संबंधीची दि.२०.०२.२०२५ रोजी सुनावणी नोटीस तक्रारकर्त्यास पोष्टाच्या ट्रकिंग रिपोर्टप्रमाणे दि.२२.०२.२०२५ रोजी प्राप्त झाल्याची दिसून येते. तथापि सदर सुनावणीची नोटीस प्राप्त होऊनही कोणतीही पुर्वसूचना न देता तक्रारकर्ता अनुपस्थित राहिले. तर, तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी हे

..२/-

दि.२८.०८.२०१९ रोजी प्राप्त झाले. एकाच दिवशी एकाच अर्जदाराकडून एकापेक्षा अधिक संख्येने माहिती अर्ज प्राप्त झाल्याने कार्यासनाचे नियमित कामकाज सांभाळून माहिती अर्जामधील नमूद ई-मेलच्या माहितीच्या शोध घेण्याचे काम चालू होते. त्यानंतर त्यांनी दि.२८.११.२०१९ रोजीच्या पत्रान्वये उत्तर देण्यात आले.

६. सुनावणीवेळी तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. तथापि, त्यांनी दि.११.०३.२०२५ च्या पत्रान्वये त्यांचे लेखी म्हणणे सादर केले आहे. त्यात त्यांनी असे नमूद केले आहे की,

तक्रारकर्त्याने दि.२०.०८.२०१९ रोजी एकूण २० माहिती अर्ज पाठविले होते. त्याद्वारे त्यांनी गृह (परिवहन) विभागाकडे माहे जानेवारी २०१८ ते ऑक्टोबर, २०१९ या कालावधीत ई-मेलद्वारे प्राप्त झालेल्या एकूण तक्रारींची संख्या, तक्रारदाराची नावे, पत्ता, तक्रारीचे विषय व तक्रारींवर केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाच्या प्रती तसेच संबंधित अधिकारी, कर्मचारी यांची नावे व पदनामे द्यावीत, अशी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितलेली होती. याबाबत त्यांनी दि.१४.१०.२०१९ अन्वये एकूण २० प्रथम अपीले सादर केली होती. सदर २० प्रथम अपीलांवर दि.०४.११.२०१९ रोजी एकत्रित सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीस अपीलकर्ते श्री. धुमाळ आणि २ कार्यासनांचे जन माहिती अधिकारी उपस्थित होते. या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी (परिवहन-२) यांनी अर्जदाराने विचारलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असून अशी माहिती तक्रार करण्यास खुप कालावधी लागेल तसेच अशी माहिती तयार करुन देणे अपेक्षित नसल्याचे मत व्यक्त केले. त्याचप्रमाणे जानेवारी, २०१८ ते ऑक्टोबर, २०१९ या कालावधीतील तक्रारीबाबतची विचारलेली माहिती परिवहन-२ कार्यासनास आढळून आली नसल्याबाबतची माहिती अर्जदारास दि.२१.०९.२०१९ रोजीच्या पत्रान्वये पाठविल्याची कागदपत्रे सुनावणी दरम्यान उपलब्ध करुन दिले होते.

तर, परिवहन विभागातील परिवहन-१ ते ५ या कार्यासनातील जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास ई-मेल बाबतची माहिती उपलब्ध करुन द्यावी, असे आदेश दि.१३.११.२०१९ रोजी दिले होते. त्यानुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दि. २८.११.२०१९ च्या पत्रान्वये माहिती निरंक आहे अशी माहिती कळविली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अर्जाबाबत कोणतीही कसूर केलेली नाही. सबब प्रस्तुत तक्रार फेटाळण्यात यावी अशी विनंती आहे.

७. या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच जन माहिती अधिकारी यांचे युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर व तत्कालीन जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांचे लेखी म्हणणे विचारात घेता आयोगाच्या असे निदर्शनास आले की, तक्रारकर्ता यांनी वरील परि.क्र.२ मध्ये नमूद केल्यानुसार माहितीच्या अधिकारांतर्गत सादर केलेले माहितीचे अर्ज (एकूण २०), त्यास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर, प्रथम अपील व प्रथम अपीलास अनुसरुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेले आदेश अशी विहित अपील प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर व प्रथम अपील आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने / उत्तराने समाधान न झाल्याने कलम १८ अंतर्गत तक्रार अर्ज सादर केला आहे.

(अ) पहिली बाब अशी की, सदर तक्रार अर्जाद्वारे तक्रारकर्त्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. परंतु, संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वरील परि क्र.५ व परि.क्र.६ मधील नमूद लेखी म्हणणे लक्षात घेता या प्रकरणात तक्रारकर्ता यांनी सन २०१८ व २०१९ या दोन वर्षाच्या कालावधीतील ई-मेल सारख्या किरकोळ बाबींवर (sundry information) सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहितीची मागणी केली होती व त्यास

..४/-

वरील न्यायालयीन अभिप्राय / निरीक्षण लक्षात घेता असे स्पष्ट होते की, किरकोळ स्वरुपाची माहिती मागणे व त्यावर शास्तीच्या कारवाईचा दबाव निर्माण करणे ही बाब प्रत्येक प्रकरणात योग्य व समर्थनीय कारण असल्याशिवाय विचारात घेता येणार नाही. त्यामुळे या प्रकरणात तक्रारकर्ता यांची दंडात्मक / शास्तीची कारवाई करण्याची विनंती मान्य करता येण्यासारखी नाही.

(ब) दुसरी बाब अशी की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार सादर केलेल्या प्रथम अपील आदेशानंतर प्राप्त झालेल्या माहितीने समाधान झाले नसेल अथवा प्राप्त माहिती असमाधानकारक असेल तर अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे विहित अपील प्रक्रियेचा अवलंब करणे अपेक्षित आहे. म्हणजेच, प्रथम अपील आदेशानंतर कलम १९ (३) प्रमाणे आयोगाच्या स्तरावर विहित कालावधीत द्वितीय अपील सादर करणे अभिप्रेत होते. परंतु, तक्रारकर्त्यांने तशी विहित अपील प्रक्रियेची कार्यवाही न करता त्याऐवजी थेटपणे कलम १८ अंतर्गत तक्रार अर्ज सादर केला आहे.

यासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्रमांक १०७८७-१०७८८/२०११ संदर्भात दि. १२.१२.२०११ च्या आदेशान्वये (Para no-3 & 4 read with 32 & 44) असे निरीक्षण / अभिप्राय नमूद केले आहेत की, माहिती अर्जास अनुसरुन माहिती नाकारली गेली असल्यास, कलम १८ अंतर्गत थेटपणे तक्रार दाखल करण्याऐवजी अर्जदाराने कलम १९ (१) व (३) मधील तरतूदीनुसार विहित अपील प्रक्रियेचा अवलंब करावा.

वरीलप्रमाणे न्यायालयीन अभिप्राय / निरीक्षण लक्षात घेता आयोग या निष्कर्षावर येते की, या प्रकरणात तक्रारकर्त्याने सादर केलेली तक्रार ही प्रथमदर्शनी (Prima-facie) अधिनियमाच्या कलम १८ अंतर्गत तक्रार म्हणून ग्राह्य ठरत नाही. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

## आदेश

**उपरोक्त विवेचनासह तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

(डॉ. प्रदीप व्यास)
27-3-2025
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : २७.०३.२०२५**